दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र./आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३८/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र./आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.केतन हादाभाई बारीया (संपादक निर्भय प्रचारक), ................अपिलार्थी
१०४, भवानी ज्योत टॉवर,
चंदन पार्क, नवघर रोड,
भाईंदर (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

जनमाहिती अधिकारी तथा,
विभागप्रमुख (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.केतन हादाभाई बारीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (सा.प्र./आस्थापना) यांचेकडे दि.०८/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) सचिन चवाथे यांच्या बडतर्फी बाबत आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीचे सर्व कागदपत्रांची सत्यप्रत करुन द्यावी.
२) स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) आरोग्य विभाग, ठाणे जिल्हापरिषद यांना पाठवलेले पत्र व त्या सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची सत्यप्रत करुन द्यावी.
३) मनपा/सा.प्र./२१६६ दि.२०१५-१६ दि.२९/०३/२०१६ च्या दाखल्याची सत्यप्रत करुन द्यावी.
४) स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) आरोग्य विभाग ठाणे जिल्हा परिषद यांनी पाठवलेले पत्र पत्र व त्यासोबत जोडलेला दाखला खरा आहे किंवा खोटा आहे. त्याची संपुर्ण माहितीची सत्यप्रत करुन द्यावी.
५) दाखला खोटा (बनावटी) असल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लेटरपेड वापरुन बनावटी दाखला बनवला असुन मिरा भाईंदर महानगरपालिकेची फसवणूक केली असुन सौ.चवाथे व सचिन चवाथे विरुध्द गुन्हा नोंद झाल्याबाबतचे सर्व कागदपत्रांची सत्यप्रत करुन द्यावी.
६) स्नेहा संजय राणे, वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) आरोग्य विभाग, ठाणे जिल्हा परिषद यांनी पाठवलेले पत्र व त्या पत्राला पाठवलेल्या उत्तराची सत्यप्रत करुन द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२६/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र./आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (सा.प्र./आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.५५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२४१/२०१८ दि.०५/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (सा.प्र./आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०८/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना मुद्दा क्र.१ बाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन मुद्दा क्र.६ ची माहिती देण्यात येईल.

३) **जन माहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना मुद्दा क्र.२ ते ५ बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) मुद्दा क्र.१ व ६ ची माहिती जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व मुद्दा क्र.२ ते ५ बाबतची माहिती विभागप्रमुख तथा जनमाहिती अधिकारी (सा.प्र) यांनी १० दिवसांत अपिलार्थी अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.केतन हादाभाई बारीया,
१०४, भवानी ज्योत टॉवर,
चंदन पार्क, नवघर रोड,
भाईंदर (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) जनमाहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सा.प्र.)

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र./आस्थापना) यांचे कार्यालय.